प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी**बी विंग ,ळापहिला मा ,

वनभवन ,सिव्हील लाईन्स ,रामगिरी रोड ,नागपूर ००१ ४४०

दुरध्वनी क्र२५५६९१६-०७१२ . , ईमेल-: apccfnodal@mahaforest.gov.in


**ई-मेलव्दारे/महत्वाचे** क्र.कक्ष-१७/नोसेल/नाशिक/आयडी-१२९१३/2749 /२१-२२

नागपूर ४४० ००१, दिनांक 22/03/2022

प्रति,

मा.प्रधान सचिव (वने),
महसूल व वनविभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

**विषय :** वनजमीन- नाशिक
प्रवाही वळण योजनेकरिता मौ.ननाशी, ता.दिंडोरी, जि.नाशिक येथील ३.४८ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत..

**संदर्भ** :- १. शासन पत्र महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्रमांक एफएलडी-१५२१/प्र.क्र.२३३/फ-१०, दिनांक ०७/०१/२०२२.
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक क्रनाशिक/नोसेल/१७-कक्ष./आयडी-१२९१३/२०७२, दिनांक १२/०१/२०२२
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांचे कडील पत्र क्रमांक कक्ष-२/जमीन/प्र.क्र./२०१६-१७/१२४०, दिनांक ११/३/२०२२

विषयांकित प्रकरणी प्रवाही वळण योजनेकरिता मौ.ननाशी, ता.दिंडोरी, जि.नाशिक येथील ३.४८ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत शासनाने संदर्भिय पत्र क्रमांक १ अन्वये १ ते ४ मुद्यांची माहिती सादर करणेबाबत इकडील होते. त्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांनी संदर्भिय पत्र क्रमांक ३ अन्वये १ ते ४ मुद्यांची माहिती या कार्यालयास सादर केलेली आहे. सदर माहिती पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्ये | मुख्य वनसंरक्षक (प्रा) नाशिक यांनी सादर केलेली माहिती |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित वनजमीन वळतीकरणामुळे वनजमिनीचे ४-५ तुकडे पडतात. सदर तुकडया –तुकडयातील वनजमीनीचे संवर्धन, संरक्षण व व्यवस्थापन करण्यास अडचणी उद्भणार नाहीत काय ? | प्रस्तावित वनजमीन वळतीकरणामुळे वनजमिनीचे सद्य:स्थितीत अस्तित्वातील प्रमुख ननाशी ते बान्हे जिल्हा मार्ग रस्त्यामुळे गट नं.१४१ व १९३ यांचे या अगोदर सदर वनजमीनीचे तुकडे झालेले आहेत. सदर जागेतून प्रवाही वळण योजना ननाशीचा वळण कालवा प्रस्तावित केल्यामुळे आणखी दोन भाग जास्त होणार आहेत. (वळतीकरण नसलेला कालव्याचा नकाशा व वळतीकरण असलेला कालव्याचा नकाशा सोबत |

| | | |
|---|---|---|
| | | जोडलेला आहे.<br>वन्यजीवांचा वावर असल्याने संबंधित यंत्रणेस व्यवस्थापन व उपाय वन विभाने सुचविलेले आहेत. तसेच या योजनेस लागूनच वनविभागाची रोपवाटिका असून या योजनेतून सदर यंत्रणा रोपवाटीकेसाठी मोफत पाणी उपलब्ध करून देणार आहेत. त्यामुळे वन संवर्धन होण्यास मदत मिळणार आहे. |
| २. | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आलेली जमीन डोंगराळ व मध्यम उताराची असल्याचे नमूद केले आहे. Kml File च्या निरिक्षणावरून सदर क्षेत्र जास्त उताराचे असल्याचे दिसून येते. सबब, मुख्य वनसंरक्षक (प्रा)नाशिक यांनी स्थळ पाहणी करून सदर क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी योग्य आहे किंवा कसे? | मुख्य वनसंरक्षक (प्रा) नाशिक यांनी दिनांक २१/०१/२०२२ रोजी भेट देवून उक्त विषयांकित प्रस्तावासाठी पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या जमीनीचे स्थळ निरिक्षण केले त्यावेळी असे आढळून आले की, सदर क्षेत्र हे उताराचेतर आहेत त्याशिवाय साधारणत: ५०% क्षेत्रात खडक व खडकापासून तयार झालेले दगड योठया प्रमाणात आहेत. सदर क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी सुयोग्य नाही असे प्रकल्प यंत्रणेने सदर जमीन आणि दुप्पट अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण करण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम भरण्यास तयार असलेबाबत हमीपत्र सादर केले आहे. सदर हमी पत्राची प्रत सोबत जोडून सादर करण्यात येत आहे. |
| ३. | कालव्याची लांबी व रुंदी नमूद करणे आवश्यक आहे. | कालव्याची वनजमीनीकरिता एकूण लांबी १३९९ मी.असून सरासरी रुंदी २४.०० मी असल्यास लेखी रिपोट केलेला आहे.<br>(कमीत कमी-२० मी व जास्तीस जास्त -५५ मी.) |
| ४. | प्रस्तावित ठिकाणी वन्यजीवांचा वावर असल्याचे उपवनसंरक्षक यांच्या अहवालात नमूद आहे. त्यामुळे त्यांच्या मुक्त संचारासाठी प्रस्तावित कालव्यावरून रस्त्यांची व्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे ? | प्रस्तावित ठिकाणी वन्यजीवांचा वावर असून त्यांच्या मुक्त संचारासाठी प्रस्तावित कालव्यावर वनविभागाचे आवश्यकते प्रमाणे संबंधित यंत्रणेकडून वेगवेगळे ठिकाणावर रस्त्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. याबाबत प्रकल्प यंत्रणेने हमीपत्र जोडून सादर केलेले आहे. |

सहपत्र :- वरीलप्रमाणे

22/3/22

( नरेश झुरमुरे)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी

प्रतिलिपी :- १. मुख्य वनसंरक्षक (प्रा) नाशिक यांना संदर्भिय पत्र क्रमांक ३ च्या अनुषंगाने माहिती करिता अग्रेषित.

२. उपवनसंरक्षक, पश्चिम भाग, नाशिक यांना माहिती करिता.